वाचले – १) मा.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा/०१/कावि/४४७/२०१५,दि.२०/१०/२०१५.
२) आदेश क्र.माशि/०१/कावि/५९८/२०२१,दि.०५/०७/२०२१.
३) आदेश क्र.माशि/०१/कावि/६८५/२०२१,दि.०१/०९/२०२१.
४) आदेश क्र.माशि/०१/कावि/७४५/२०२१,दि.०४/१०/२०२१.
५) माध्यमिक विद्यालय काळभोरनगर,पिंपळे सौदागर,निगडी,पिंपळे गुरव, केशवनगर,खराळवाडी,क्रिडा प्रबोधिनी,रूपीनगर यांचे पत्र.
६) मा.अतिरिक्त आयुक्त यांचा दि. ०८/०२/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.माध्य/शि/०१/कावि/ ७१ /२०२३
दि. ०८/०२/२०२३

विषय :- "मुख्याध्यापक" पदावरील पदोन्नती नियमित करणेबाबत.

आदेश,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,माध्यमिक शिक्षण विभागाचे आस्थापनेवर मुख्याध्यापक या अभिनामाचे १८ पदे र.रु. ४७६००-१५११०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजुर आहेत. या संवर्गामध्ये १० पदे पदोन्नतीने भरणेकारीता दि.२५/०६/२०२१ रोजी पदोन्नती निवड समिती सभा आयोजित करण्यात आली होती. सदरच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपुर्व मुख्याध्यापक पदाची सेवाजेष्ठता,शैक्षणिक अर्हता, गोपनिय अभिलेख, अनुभव कालावधी, आरक्षण इ.बाबींचा विचार करुन खालील सहाय्यक शिक्षकांना मुख्याध्यापक या पदावर पदोन्नती देण्यास शिफारस केलेली होती. त्यानुसार वाचले क्र. ०२ ते ०४ अन्वये "मुख्याध्यापक" पदावर ०१ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता हंगामी स्वरुपात १० मुख्याध्यापक पदोन्नतीने नेमणुक देण्यात आल्या आहेत.त्यापैकी नियत वयोमानानुसार ०१ मुख्याध्यापक सेवानिवृत्त झालेले आहेत. ऊर्वरीत ०९ मुख्याध्यापक खालील प्रमाणे.

| अ. क्र. | सहा.शिक्षक यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नती आदेश दिनांक | माध्यमिक विद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.नाडेकरबुधा काशिनाथ | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि.निगडी |
| २ | श्री.केदार शंकर नारायण | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि.काळभोरनगर |
| ३ | श्री.वायळ जयराम लक्ष्मण | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि. क्रिडा प्रबोधिनी |
| ४ | श्री.वसावे धीरसिंग धर्मा | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि.संत तुकारामनगर |
| ५ | श्री.चपटे रामदास तुकाराम | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि.केशवनगर |
| ६ | श्री.भोयर दुलीचंद हरिचंद | अनु. जमाती(खुला) | ०५/०७/२०२१ | मा.वि.पिंपळे सौदागर |
| ७ | श्री.भोये नामदेव काशिराम | अनु. जमाती(खुला) | ०१/०९/२०२१ | मा.वि. खराळवाडी |
| ८ | श्री.कोंढावळे राजू पांडुरंग | अनु. जमाती(खुला) | ०१/०९/२०२१ | मा.वि.रूपीनगर |
| ९ | श्री.मुदगुण पांडुरंग शंकर | अनु. जमाती(खुला) | ०४/१०/२०२१ | मा.वि.पिंपळे गुरव |

अ.क्र. ०१ ते ०९ येथील नमुद मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांचे परिविक्षाधिन कालावधीतील कामकाज, हजेरी व वर्तणुक समाधानकारक असुन सद्यस्थितीत त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही.तसेच श्री.वसावे धीरसिंग धर्मा व श्री.भोये नामदेव काशिराम यांनी डी.एस.एम. पदविका धारण केलेले मार्कशिट सोबत नस्तीस जोडलेले आहे.

सबब, मी अतिरिक्त आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ मला वाचले क्र.०१ अन्वये प्राप्त अधिकाराचनुसार प्रस्तुतच्या आदेशान्वये वरील कर्मचा-यांना उपरोक्त वाचले क्र.०२ ते ०४ चे आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन तसेच मागासवर्गीय कर्मचा-यांचे पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त क्र.०१ ते ०९ वरील कर्मचा-यांची "मुख्याध्यापक" या पदावर देण्यात आलेली पदोन्नती ही पदोन्नती आदेशाच्या दिनांकापासून नियमित करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.श्री.मारणे हनुमंत नथोबा,मुख्याध्यापक यांचा मुख्याध्यापक पदावर अल्प कालावधी असल्याने त्यांना नियमित वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करणेत आलेले नाही.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रत- १) लेखा विभाग
२) मुख्य लेखापरिक्षक
३) प्रशासन विभाग, कर्मचारी वैयक्तिक नोंदणी कक्ष, संगणक कक्ष (प्रशासन) मागासवर्गीय कक्ष
४) माध्यमिक शिक्षण विभाग टेबल क्र. ०४
५) माध्यमिक विद्यालय -------------
२/- पुढील कार्यवाहीसाठी.

उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८